ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# न्हावीसांडसव सांगवीसांडस येथील अप्रकाशित मराठी शिलालेख



डॉ. विजय सरडे
डॉ. शिवाजी वाघमोडे

## प्रस्तावना:

मराठा कालखंड, म्हणजेच सु. १६०० ते १८५० या कालखंडात दख्खनच्या मोठ्या भूभागावर मराठ्यांचे राजकीय महत्त्व वाढून ते अखिल भारतीय स्तरावर पोहोचले होते. पुढे १८व्या शतकात मराठा सत्तेची बरोबरी करणारा कोणीही शासक अखंड भारतात उरला नव्हता. त्यामुळे मराठेशाहीतील अनेक मातब्बर सरदारांनी एक मोठी सशक्त फौज निर्माण केली होती. या काळात राजकीय क्षेत्रासोबतच सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व धार्मिक क्षेत्रांतही अनेक महत्त्वाचे बदल घडले. अनेक मराठा सरदार व स्थानिक प्रमुखांनी जागोजागी मंदिरे, वाडे, गढी, विहिरी, बारव, घाट इत्यादी वास्तूंचे निर्माणकार्य केले. यांपैकी काही वास्तूंच्या नोंदी शिलालेखांच्या माध्यमातून सध्याही जपलेल्या दिसतात. सदर संशोधन पत्रात पुणे जिल्ह्यातील न्हावी सांडस व सांगवी सांडस येथील अप्रकाशित शिलालेखांचे वाचन व महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

## न्हावी सांडस येथील महादेव मंदिराच्या ओवऱ्यावरील शिलालेख

न्हावी सांडस हे गाव पुण्याहून ३८ किमी अंतरावर भिमा नदीकाठी वसले आहे. पुणे-नगर रस्तेमार्गाने येथे सहज पोहोचता येते. या गावाजवळ पिंपरी सांडस व सांगवी सांडस ही अन्य दोन गावे देखील आहेत. 'सांडस' ही संज्ञा या गावांच्या मागे लावण्याचा उद्देश समजून येत नाही. न्हावी सांडस येथील एका जनश्रुतीनुसार सदर गावे भौगोलिकदृष्ट्या नदीकिनारी असून ती नदीच्या जाळ्यात स्वयंपाकघरातील सांडसीप्रमाणे अडकलेली दिसतात. 'न्हावी' या शब्दाचा संबंध पाण्यातील नावेशी जोडला जातो. तसेच कोण्या एका नावाड्याने काही सरदारांना आपल्या नावेतून भिमा नदी पार करून दिल्याने सुरुवातीला 'नावी' व नंतर 'न्हावी' असे नामकरण या गावाचे झाल्याचे सांगितले जाते. शितोळे घराण्याशी संबंधित इ.स १७८२ सालातील काही कागदपत्रांमध्ये 'तालुके सांडस' हे नाव पाहावयास मिळते.[१] बहुदा हा उल्लेख वर्तमान 'न्हावी सांडस' या गावाचा असावा. या गावात महादेव मंदिर (१८.६०७३९८, ७४.१५६०८७), भैरवनाथ मंदिर (१८.६०७०९६, ७४.१५६९७९), दुसरे महादेव मंदिर (१८.६०७१९७, ७४.१५७००६), पुंडलिक मंदिर (१८.६०६९४९, ७४.१५५०४८) ही उत्तर-मराठाकालीन मंदिरे आहेत.

न्हावी सांडस गावाच्या मध्यभागी असणारे महादेव मंदिर चारी बाजूंनी प्राकारभिंतींनी बंधिस्थ आहे. मंदिर संकुलाच्या दर्शनी बाजूस ओवऱ्यांची रचना आहे. महादेव मंदिर उत्तम स्थितीत असून सभामंडप व गर्भगृह असा त्याचा सर्वसामान्य तलविन्यास आहे. मंदिराचे शिखरही आपल्या मूळ अवस्थेत शिल्लक आहे. मंदिरासमोर उघड्यावर एक नंदी ठेवला आहे. याशिवाय मंदिरात शिवलिंग, गणेश, गजलक्ष्मी व कूर्मशिल्प आहेत. मंदिराजवळसुमारे१४-१५व्याशतकातीलसतीशिळा आहे**(चित्रक्र. १)**.

महादेव मंदिराच्या प्राकारभिंतीच्या दर्शनी बाजूस असणाऱ्या ओवऱ्यांना एक पूर्वाभिमुख प्रवेशद्वार आहे. याच्या दोन्ही बाजूंवर शरभ कोरले असून मध्यभागी ललाटपट्टीवर गणेशाचे शिल्प आहे. या प्रवेशद्वाराच्या डाव्या बाजूला ९ ओळींचा देवनागरी लिपीतील एक मराठी लेख कोरला आहे. त्याची अक्षरवटिका उठावदार असून लेख कोरलेली शिळा ३७ सेमी उंच व ३४ सेमी रुंद अशी आहे. ऊन, वारा, पाऊस यांमुळे शिलालेखाच्या डाव्या भागातील काही शब्द पुसट झाले आहेत, तर काही अक्षरे तुटून गेली आहेत. या लेखातील नेमका शक वर्षाचा उल्लेखच नष्ट झाल्याने शिलालेखाची निश्चित तारीख सांगता येत नाही (**चित्र क्र. २**).

### शिलालेखाचे वाचन:

१. श्री मोरेश्वर च [रणी] +
२. वास : मंबाजी सुत ++
३. वाजी व भगवंतराव +
४. पीराजी व गणोजी [सी?]
५. तोळे पाटील मौजे [न्हा?]
६. वि नीजदास : सके ++++
७. विभव नामसंवतसरे +
८. चैत्र सुध १ प्रतीप [दा दि ?]
९. वसी वोवऱ्या समा [प्ती ?]

**अर्थ:** लेखात सुरुवातीलाच मोरेश्वराला वंदन केले आहे. मौजे न्हावी (?) येथील मंबाजीसुत बाजी (?) व भगवंतराव (सुत) पीराजी व गणोजी शितोळे पाटील यांनी विभवनाम संवत्सर चैत्र शुद्ध १ प्रतिपदा या दिवशी ओवऱ्या बांधून पूर्ण केल्या.

### सांगवी-सांडस येथील मंदिरे व शिलालेख

सांगवी-सांडस हे पुण्यापासून ४५ किमी दूर भिमा व वेळ नद्यांच्या संगमावर वसलेले एक छोटेसे गाव आहे. पुणे-नगर रस्त्यावरील वाघोली किंवा कोरेगाव-भिमा मार्गे येथे सहज पोहोचता येते. या गावाजवळ भिमा नदीच्या पलीकडे विठ्ठलवाडी हे दुसरे गाव आहे. सांगवी-सांडस येथील विष्णू मंदिरामुळे या गावाला 'विष्णुपुर' या नावानेही ओळखले जाते. या गावात विष्णू, महादेव आणि गणेश व श्रीनाथ यांची मंदिरे आहेत.सांगवी सांडस येथील मंदिरांच्या रचनेवरून येथील सर्व मंदिरे उत्तर-मराठा कालखंडात म्हणजेच १८-१९ व्या शतकात बांधली असावीत. विष्णू मंदिर (१८.६१९५१०, ७४.१७३३२५)भिमा नदीकाठी असून त्याच्या डाव्या बाजूला शिव व उजव्या बाजूला गणेशाची मंदिरे आहेत. विष्णू मंदिराच्या सभामंडपात कूर्मशिल्प आहे आणि गर्भगृहात विष्णूचे सुंदर शिल्प उभे आहे. शिल्पात विष्णूच्या हातात गदा, पद्म, शंख आणि चक्र आहेत (**चित्र क्र. ३**). मंदिरासमोर

घाट असून येथून भिमा नदीचे विस्तीर्ण पात्र आकर्षक दिसते. गावातील सर्वशिलालेख मराठी भाषा व देवनागरी लिपीत कोरले आहेत.

## श्रीनाथ मंदिरातील शिलालेख

सांगवी गावाच्या दुसऱ्या बाजूला श्रीनाथाचे मंदिर (१८.६१९६१५, ७४.१७१८४६)आहे. हे मंदिर जुनं असलं तरी अलीकडेच पाडून नवीन मंदिर बांधण्यात आले आहे. मंदिराच्या मागे एक खंडित नंदी व एक वीरगळ ठेवला आहे.मूळ मंदिरातील चार ओळींचा मराठी शिलालेख नवीन पायरीत बसविला आहे.सदर लेख खोदीव स्वरूपाचा आहे (**चित्र क्र. ४**).

**शिलालेखाचे वाचन:**

१. **॥ श्री नाथाचे दे. (देऊळ) भी :**

२. **॥ श. (शके) १७९० सा. लक्षुम**

३. **॥ ण व हानवंता क**

४. **॥ पी. धा. का. ब. दे.**

## शिलालेखाचा संक्षिप्त अर्थ व महत्त्व:

शके १७९० म्हणजेच इ.स. १८६८ साली लक्ष्मण व हानुमंत यांनी श्री नाथाचे मंदिर बांधले. शिलालेखात संक्षिप्त शब्दांचा भरपूर उपयोग केला आहे. संभवतः लक्ष्मण व हानुमंत हे वडार (पाथरवट) समाजातील व्यक्ती असाव्यात. लेखात उपयोगात आणलेले शब्द संक्षेप हे या लेखाचे वेगळेपण आहे. यातील काही शब्द संक्षेपाची ओळख पटत नाही. या कोरीव लेखाच्या माध्यमातून श्रीनाथाचे मंदिर बांधल्याची स्मृती जपलेली आहे.

## सांगवी-सांडस येथील अन्य शिलालेख

श्री नाथ मंदिरापासून जवळच असणाऱ्या श्री. संदीप पोपट लोले यांच्या वाड्याच्या भिंतीवरील २५ सेमी उंच व ७२ सेमी रुंद अशा एका शिळेवर एक लेख कोरला आहे (**चित्र क्र. ५**).

**शिलालेखाचे वाचन:**

**१. म्हा मादु व रामा व पिला वडा श्री [र]**

**२. वी १८१८**

**अर्थ:** मादु, रामा व पिला या वडार (पाथरवट) समाजातील व्यक्तींनी शके किंवा इ.स. १८१८ साली सदर वाड्याचे बांधकाम झाले. लेखातील वर्ष हे शक किंवा इसविसनात असल्याचा उल्लेख नसल्याने निश्चित तारीख स्पष्ट होत नाही. जर तारीख ही इसविसनात शोधली तर ती इ.स. १८९६ अशी येते.

एक अन्य शिलालेख देखील श्री. संदीप पोपट लोले यांच्या वाड्यात आहे. लेख कोरलेल्या शिळेची उंची सु. ९ सेमी असून रुंदी ७० सेमी इतकी आहे. लेखात '**बा । (र) का राम देव जी वडारी**' अशी अक्षरे कोरलेली दिसतात. सदर लेखात वाडा बांधणाऱ्या रामा देव जी वडार यांचे नाव आलेले आहे (**चित्र क्र. ६**). वाडा बांधण्याची स्मृती जपणे हा या मागील उद्देश्य दिसतो.

## चर्चा व निष्कर्ष

न्हावी सांडस येथील लेख अनेक दृष्टीने महत्त्वाचा आहे. शितोळे घराण्याचे मूळ उत्तर भारतातील सिसोदिया वंशातील मानले जात असून सु. बाराशे वर्षांपूर्वी ते उत्तरेतून महाराष्ट्रात स्थायिक झाल्याचे सांगितले जाते. निजामशाही, आदिलशाही, मोगल तसेच मराठा कालखंडात या घराण्याकडे पुणे परगण्यातील देशमुखीचे हक्क होते. शितोळे राजा देशमुख प्रांत पुणे हा किताब विजापूरच्या सुल्तानाकडून त्यांना मिळाला. सु. ३००-३५० वर्षांपूर्वी शितोळे देशमुखांची नरसिंह शितोळे, नाईक शितोळे व सातभाई शितोळे या तीन शाखांमध्ये विभागणी झाली. या घराण्यातील मालोजीराव दुसरे यांनी पुरंदरच्या लढाईत गाजवलेल्या पराक्रमाबद्दल छत्रपती शाहूंनी त्यांना पुण्याजवळील काही गावे इनाम म्हणून दिली होती.[२] बहुदा या गावांच्या यादीमध्ये न्हावी सांडस हे देखील असावे. पुणे परिसरातील लवळे, पाषाण, वानवडी, हडपसर, मांजरी, मोशी यांसारखी अनेक गावे यांच्याकडे होती. शितोळे घराण्यात रोटमलनाथाला आदराने पूजले जाते. पाटस जवळील 'रोट' या गावातील मंदिर यांचे मुख्य धार्मिक स्थान आहे. या घराण्यामध्ये मुलाचे जावळ हे रोटोबाच्या चरणाजवळ काढण्याची प्रथा आहे. मुलाबरोबर आईचेही केस रोटोबाला अर्पण केले जातात. मुलांची शेंडी ही मोरगावच्या मोरेश्वरासमोर ठेवतात.[३] त्यामुळे न्हावी सांडस येथील शिलालेखात बहुदा मोरगावच्या मोरेश्वराला वंदन केले असण्याची दाट शक्यता आहे. सदर शिलालेखावरून शितोळे घराण्याची गणेशभक्तीही दिसून येते.

न्हावी सांडस शिलालेखातील शक सन नष्ट झाल्याने तो कधी कोरला असावा, हे निश्चितपणे सांगता येत नाही. तरीही लेखाच्या काळासंबंधी काही आडाखे बांधता येऊ शकतात. १८वे शतक हे मराठ्यांच्या उत्कर्षाचे शतक मानले जाते. या काळात अनेक मंदिरे बांधण्यात आली. मंदिर स्थापत्यशैलीनुसार या गावातील सर्व मंदिरे एकाच काळात म्हणजे १८व्या शतकातील वाटतात. या शिलालेखात विभव नाम संवत्सराचा उल्लेख आलेला आहे. हे संवत्सर १८व्या शतकात फक्त शके १६७०-७१ (इ.स. १७४८-१७४९) या सालीच येते. यापूर्वी हे संवत्सर शके १६११ (१२ मार्च १६८९) या रोजी आलेले आहे.[४] त्यामुळे वरील सर्व शक्यता लक्षात घेता, सदर शिलालेख शके १६७०-७१ (इ.स. १७४८-१७४९) मध्ये खोदला असण्याची शक्यता अधिक आहे. हा शिलालेख वंशावळीच्या दृष्टीनेही महत्त्वाचा आहे. यात शितोळे-पाटील घराण्यातील मंबाजी, बाजी (?), भगवंतराव, पीराजी व गणोजी शितोळे या पाच व्यक्तींची नावे आली आहेत. विशेष म्हणजे उपलब्ध कागदपत्रांमध्ये या व्यक्तींची नावे कुठेही आढळली नाहीत. त्यामुळे शितोळे घराण्याच्या पूर्वजांच्या नामावळीत या नवीन नावांची भर पडली आहे. या लेखाचे एक मोठे वैशिष्ठ्य म्हणजे आतापर्यंत शितोळे-पाटील घराण्यासंबंधित माहिती सांगणारा पुणे परिसरातील हा पहिलाच शिलालेख आढळून आलेला आहे.

सांगवी सांडस येथील शिलालेखांमधून वडार समाजाच्या मंदिर व बांधकाम क्षेत्रातील योगदानाचा ठळक उल्लेख दिसतो. याशिवाय गावात एक बुजलेली मारुती मंदिर, बारव, वाडे व घाट आहेत. हे सर्व ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे ठरतात.सांगवी-सांडस येथील मंदिरे आणि शिलालेख, स्थानिक इतिहास आणि संस्कृतीची समृद्ध परंपरा दर्शवतात, ज्यात वडार समाजाचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

**आभार:** संशोधक,तत्त्व हेरीटेज फाउंडेशन व श्री मनीष माहेश्वरी यांचे आभारी आहेत, ज्यांनी पुणे जिल्ह्यातील मंदिरांच्या सर्वेक्षणात मोलाचे सहकार्य केले.


## संदर्भ


१. घोरपडे, सुशिलादेवी, राजा शितोळे आणि महाराज महादजी शिंदे राजमाता सुशिलादेवी घोरपडे (सोंडूर) यांची स्मरणगाथा, सोंडूर, १९९८: ११५-१११. (सदर माहित श्री. सुशिलादेवी घोरपडेयांनी श्री. आबाजीराव फाळके यांच्या अनुमतीने कै. सरदार आनंदराव भाऊ फाळके इतिहासकार यांच्या कागदपत्रांतून घेतली आहे)

२. घोरपडे, सुशिलादेवी, पूर्वोक्त, १९९८: ११-२२.

३. घोरपडे, सुशिलादेवी, पूर्वोक्त १९९८: ११–१५ .

४. Pillai, S. An Indian Ephemeris, Vol. VI -A. D. 1600 to A. D. 1799, Madras: The Superintendent Government Press, 1922.

**चित्र क्र. १. : सतीशिळा, न्हावीसांडस, पुणेजिल्हा.**




चित्र क्र. २. न्हावी-सांडस येथील अप्रकाशित मराठी शिलालेख



चित्र क्र. ३. विष्णूमंदिरातीलविष्णूशिल्प, सांगवीसांडस, पुणेजिल्हा.



चित्र क्र. ४. श्रीनाथमंदिरातीलशिलालेख, सांगवीसांडस, पुणेजिल्हा



चित्र क्र. ५.श्री. संदीप पोपट लोले यांच्या वाड्याच्या भिं तीवरील लेख, सांगवीसांडस.



चित्र क्र. ६. श्री. संदीप पोपट लोले यांच्या वाड्याच्या भिं तीवरील दुसरालेख, सांगवीसांडस.